# ११. ई-मेल

● **ऐका. वाचा. म्हणा.**

एक दोन तीन चार
जाते ई-मेल समुद्रापार
नवीन पद्‌धतीचा हा चमत्कार
आता कशाला होता बेजार?

नको पेन, नको पाकीट
नको कागद, नको तिकीट
नको आता पोस्टात जायला
नको पोस्टमनची वाट बघायला.

हवा असतो घरी संगणक एक
टेलिफोन आणि मोडेम एक
किंवा मग इंटरनेट कॅफेत चला
झटपट ई-मेल करता येईल तुम्हांला.

मिनिटाच्या आत पत्र पोचते
वाचलंय की नाही तेही कळते
तिकडूनही उत्तर चटकन येते
डोक्याला अजिबात कटकट नसते.





**निर्मला सारडा** (जन्म-१९५२) : 'बाहुलीच्या लग्नाची तयारी', 'चांदोबाच्या कविता', 'गंमतगाणी', 'कविता कॉम्प्युटरच्या', 'कॅडबरीचा बाजार' हे बालकवितासंग्रह प्रसिद्ध.

प्रस्तुत कवितेतून ई-मेल या नवीन तंत्रज्ञानाची ओळख व उपयोग यांचे अतिशय रंजकपणे व सोप्या भाषेत वर्णन केले आहे.

**शब्दार्थ : समुद्रापार** – समुद्राच्या पलीकडे. **बेजार** – हैराण.

## स्वाध्याय



**प्र. १. खालील प्रश्नांची एक–दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) पोस्टमनची वाट बघायला नको, असे कवयित्री का म्हणतात?

(आ) ई–मेल करण्यासाठी कशाकशाची आवश्यकता असते?

(इ) ई–मेलमुळे अजिबात त्रास होत नाही, यामागची कवितेत आलेली कारणे लिहा.

**प्र. २. ई–मेलमुळे पोस्टमनचे काम खूप सोपे झाले आहे, असे तुम्हांला वाटते का? असे कशावरून वाटते?**

**प्र. ३. खालील शब्दजाल पूर्ण करा.**

ई–मेल संदर्भातील शब्द → [ ] → [ ] → [ ]

**प्र. ४. संगणकाशी संबंधित असणारे तुम्हांला माहीत असलेले शब्द लिहा.**

## खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील शब्दांसाठी मराठीतील शब्द लिहा.**

(१) कॉम्प्युटर–　(२) इंटरनेट–　(३) टेलिफोन–



## लिहिते होऊया.

- **ई–मेल आय डी सुरू करताना तुम्ही कोणकोणत्या कृती केल्या त्याचा क्रमवार ओघतक्ता तयार करा.**
- **मित्र/मैत्रिणींना ई–मेल पाठवण्याचा तुमचा अनुभव सात–आठ ओळींत लिहा.**

## नेहमी लक्षात ठेवा.

(१) संगणकाच्या स्क्रीनसमोर दीर्घकाळ बसू नये, त्यामुळे डोळ्यांवर ताण येतो.

(२) प्रत्येक वीस मिनिटानंतर जागेवरून उठून दहा–बारा पावले फिरून यावे, त्यामुळे आपले स्नायू सुस्थितीत राहतात.

(३) संगणकावर काम करणारी व्यक्ती व संगणकाची स्क्रीन यांमध्ये योग्य अंतर असावे.

(४) स्वत:चा पासवर्ड नेहमी गोपनीय ठेवावा.

(५) सर्व इलेक्ट्रिक वायर सुस्थितीत असल्याची खात्री करावी, तसेच संगणक चालू असताना आतील भागास हात लाऊ नये.



## सारे हसूया.

**काका** : अरे रवी, मोटारीनं तुला धडक दिली म्हणे.
**रवी** : त्या वेळी रस्त्यावरचा फलक वाचत होतो.
**काका** : काय लिहिलं होतं त्या फलकावर?
**रवी** : रस्त्यावरचे अपघात टाळण्याचे उपाय लिहिले होते.

**काकी** : मधू, तू तुझ्या आईचं सगळं ऐकतोस का ?
**सागर** : मी तर आई सांगते त्याच्या दुप्पट ऐकतो.
**काकी** : ते कसं काय ?
**सागर** : आई जेव्हा मला डब्यातून एक लाडू घ्यायला सांगते, तेव्हा मी चक्क दोन लाडू घेतो.